## प्रेसनोट दिनांक १५/०२/२०२४

# चाकूचा धाक धाकवून पैसे लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारास शहर गुन्हे शाखेकडून अटक

---

सोलापूर शहरामध्ये, दि. ३०/०१/२०२४ रोजी विजापूर बायपास रोड, जय मल्हार हॉटेलच्या समोरील बाजुस हिरजकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरुन येवून, एका व्यक्तीला चाकूचा धाक दाखवून व त्यास जबरदस्तीने गाडीवर बसवून घेवून जावुन, त्याच्या एटीएम कार्डमधून जबरदस्तीने ८०,०००/- रुपये काढून घेतले होते. त्याबाबत दि.१२/०२/२०२४ रोजी, नमूद घटनेतील फिर्यादीने तक्रार दिल्याने, फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८६/२०२४ भांदवि कलम ३९४, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखून सदरचे गुन्हा उघडकीस आणेबाबत श्री.एम.राज कुमार, मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दिपाली काळे, मा.पोलीस उपआयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, यांनी गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने, गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व पथकातील अंमलदार पोना/१३७९ बापू साठे, पोशि/१७२९ सुभाष मुंढे, पोशि/१०७५ भारत पाटील, पोशि/१७१२ सैपन सय्यद यांनी घटनास्थळ व आजुबाजुचे परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पडताळणी केली होती. सदर प्राप्त सी.सी.टी.व्ही.फुटेजच्या आधारे सोलापूर शहरामध्ये सदर आरोपीचा शोध घेत असताना, दि.१२/०२/२०२४ रोजी पोउपनि/अल्फाज शेख व पथकास बातमी मिळाली की, "यातील फिर्यादीस मारहाण करुन, त्याचे ए.टी.एम.कार्डचा वापर करून, पैसे काढून घेणारे दोन इसमापैकी एक संशयित इसम हा, सी.एन.एस. हॉस्पीटल जवळ, मंगळवेढा रोड, सोलापूर येथे रोडलगत असणाऱ्या हनुमान मंदीराजवळ मोटार सायकलवर थांबला आहे".

अशी बातमी मिळाल्याने, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख व त्याचे तपास पथकाने बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन, इसम नामे- प्रेम संजय हलकवडे, वय २० वर्षे, रा. घर नं. २०२, थोबडे वस्ती, देगांव नाका, सोलापूर यास ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक तपास करता, त्याने त्याचे आणखी एका साथीदारासह सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यावेळी, त्याचे अंगझडतीमध्ये गुन्ह्यातील जबरीने चोरलेली रोख रक्कम ४०,००० रुपये, तसेच गुन्हा करणेकरीता वापरलेला एक चाकू व मोटार सायकल मिळून आली आहे. त्याचप्रमाणे, त्याचेकडे फिर्यादीचे- पाकीट, आधार कार्ड, पॅनकार्ड हे सुध्दा मिळुन आले आहे. अशा प्रकारे, पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने, सराईत गुन्हेगार प्रेम संजय हलकवडे याचेकडून, जबरीने चोरलेले ४०,०००/- रूपये व गुन्हा करण्याकरीता वापरलेले चाकू व मोटार सायकल असा एकूण ६०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे. पुढील तपास फौजदार चावडी पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी, श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि/ अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, वसीम शेख, सतिश काटे ,सायबर पोलीस ठाणेकडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करिता.


गुन्हे शाखा, सोलापूर शहर